आजचा शुभ विचार

"माणसाला दारिद्र्याची नव्हे तर त्याच्या दुर्गुणांची लाज वाटली पाहिजे."
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-33 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thurseday 05 June 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ३३ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ गुरुवार, दि. ०५ जुन २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

## नाशिक शिवसेना उद्धव ठाकरे पक्षात मोठे वादळ
## सुधाकर बडगुजरांची उद्धव सेनेतून हकालपट्टी

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------



नाशिक शहर जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांची उद्धव सेनेतून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपाक ठेवून सुधाकर बडगुजर यांच्यावर कावाई करण्यात आली आहे. बडगुजर लवकरच महायुतीत सहभागी होण्याची शक्यता आहे. सुधाकर बडगुजर यांनी नाशिकमध्ये उद्धव सेनेचे अनेकजण पक्षावर नाराज आहेत, असे संकेत दिले होते. महानगरप्रमुख विलास शिंदे यांच्यासह दहा ते बारा जण पक्ष नेतृत्वावर नाराज आहेत, असे सूतोवाच त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केले होते. शिवाय सुधाकर बडगुजर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेतली होती. यामुळे महापालिका निवडणुकीआधी नाशिकमध्ये उद्धव गटाला धक्का बसणार अशी चर्चा होती. या पार्श्वभूमीवर सुधाकर बडगुजर यांची उद्धव सेनेतून हकालपट्टी करण्यात आली आहे. उद्धव सेनेचे नाशिक जिल्हा प्रमुख डी जी सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या पत्रकार परिषदेला नाशिकचे उपनेते आणि नाशिक शहर जिल्हाप्रमुख असूनही सुधाकर बडगुजर गैरहजर होते. नियोजित कार्यक्रमासाठी नाशिक बाहेर असल्याने पत्रकार परिषदेला अनुपस्थित असल्याचे बडगुजरांनी कळवले होते. पण पत्रकार परिषद सुरू होण्याच्या सुमारास मुंबईतून फोन आला आणि सुधाकर बडगुजर यांची पक्षातून हकालपट्टी केल्याचे कळवण्यात आले. यानंतर ही माहिती प्रसारमाध्यमांना देण्यात आली.

### कोण आहेत सुधाकर बडगुजर ?

पक्षातून हकालपट्टी होण्याआधी सुधाकर बडगुजर उपनेते आणि नाशिक शहर जिल्हाप्रमुख होते. ते राज्यसभा खासदार संजय राऊत यांचे जवळचे म्हणून ओळखले जात होते. राजकारणातली कारकिर्द २००७ पासून सुरू करणाऱ्या बडगुजरांनी अल्पावधीत प्रगती केली होती. ते २००९ ते २०१२ या काळात नाशिक महापालिकेचे सभागृह नेते होते. तसेच २०१२ ते २०१५ दरम्यान बडगुजर नाशिक महापालिकेचे विरोधी पक्षनेते होते. ते तब्बल १५ वर्ष नाशिक महापालिकेचे नगरसेवक होते.

## पक्षातून हकालपट्टीची कारवाई केल्यानंतर भूमिका काय?
## "योग्य वेळी योग्य प्रतिक्रिया देईल ..." सुधाकर बडगुजर

**शैलेश रौंदळ**
**नाशिक प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

---------------------------



ठाकरेंच्या शिवसेनेचे उपनेते सुधाकर बडगुजर यांची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड आणि जिल्हाप्रमुख डी.जी.सूर्यवंशी यांनी आज (बुधवार) दिली.

बडगुजर यांनी पक्षविरोधी वक्तव्य केल्यामुळे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख संजय राऊत यांनी ही कारवाई केल्याचे दत्ता गायकवाड यांनी सांगितले. या हकालपट्टीनंतर बडगुजर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली असून, यावर भाष्य केले आहे.

यावेळी बोलतांना सुधाकर बडगुजर म्हणाले की, "पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी घेतलेला निर्णय मला मान्य आहे. पक्षात नाराजी व्यक्त करणे, हा काही गुन्हा नाही. मात्र, याबाबत माझ्याशी कुठलीही चर्चा झाली नाही. परंतु, पक्षावर नाराजी व्यक्त करणे किंवा मुख्यमंत्र्याना भेटण्यावरून जर हकालपट्टीची कारवाई होत असेल तर हे चुकीचे आहे", असे त्यांनी म्हटले. तसेच "सध्या मी नाशिकच्या बाहेर आहे. त्यामुळे पक्षाच्या पत्रकार परिषदेत उपस्थित राहू शकलो नाही. माझा नियोजित दौरा असल्याचे मी पक्षाला कळवले होते. कोणाची हकालपट्टी करायची कोणाला पक्षात ठेवायचे हा पक्षाचा निर्णय आहे. यावर मी काहीही बोलू इच्छित नसून, सध्या वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहे. तसेच या हकालपट्टीवर योग्य वेळी माझी प्रतिक्रिया देईल" , असे सुधाकर बडगुजर यांनी सांगितले.

## राज्यात यंदा दहा कोटी वृक्ष लागवड करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



राज्यातील वनाच्छदनाची टक्केवारी वाढविण्यासाठी 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या अभियानाअंतर्गत यावर्षी राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केली. पुढील वर्षीही १० कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट आहे. वृक्षारोपण ही लोकचळवळ झाली तरच ही मोहीम यशस्वी होईल. त्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान अंतर्गत वृक्ष लागवड मोहिमेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी बोलताना फडणवीस म्हणाले, राज्यातील ३३ टक्के वनाच्छदनाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी पुढील २० वर्षे हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र हे अभियान मोहिम स्वरुपात राबविणे आवश्यक आहे. महाराष्ट्राने गेल्या आठ वर्षात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली आहे. यापूर्वी ३३ कोटी आणि ५० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट यशस्वीपणे गाठले आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षीचे उद्दिष्ट नक्कीच पूर्ण करता येईल. वृक्षारोपणात किमान दिड ते तीन वर्षे वयाची रोपे लावण्यात यावीत. लावलेली झाडे टिकतील, वाढतील यासाठी प्रयत्न व्हावेत. तसेच लावलेल्या वृक्षारोपणाची जगण्याची टक्केवारी वाढावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. तसेच यासाठी रिमोट सेन्सिंग, उपग्रह आदी साधनांचाही वापर करून पारदर्शकपणे कामे होण्याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या. १० कोटी वृक्ष लागवड मोहिमेसाठी सर्व विभागांनी जागा तसेच दर्जेदार रोपे निश्चित करावीत. वृक्षारोपण मोहिमेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदांनी सहभाग घ्यावा. तसेच सामाजिक संस्थांनाही यामध्ये सहभागी करून घ्यावे. दहा कोटी झाडे लागवडीच्या मोहिमेच्या यशाचे गमक हे चांगली नर्सरी आहे. त्यामुळे उद्दिष्ट पूर्तीसाठी आवश्यक आणि दर्जेदार रोपे मिळावीत, यासाठी नर्सरी तयार करणे आवश्यक आहे. तसेच खासगी नर्सरीमध्ये चांगली रोपे तयार होतील, याकडे लक्ष द्यावे. प्रादेशिक परिस्थितीनुसार झाडांची लागवड करण्यात यावी. वृक्षारोपण अभियानाच्या कामासाठी 'कॅम्पा' अंतर्गतचा निधीचा पुरेपूर वापर करावा, असे निर्देशही फडणवीस यांनी बैठकीत दिले.

### महामार्गालगत झाडे लावण्याची जबाबदारी वन विभागाकडे

राज्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच पालखी मार्गाच्या कडेला वृक्षारोपण करण्याच्या कामाची जबाबदारी आता वन विभागाकडे सोपविण्यात येईल. त्याचप्रमाणे गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उद्योग येत आहेत. त्यामुळे या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड होणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढील वर्षी गडचिरोली जिल्ह्यात १ कोटी झाडे लावण्याचा विचार असून लवकरच त्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. याशिवाय जोतिबाच्या डोंगरावही मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याचेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, वन मंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री आशीष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्यासह विविध विभागांचे सचिव, वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## "महाराष्ट्राच्या हितासाठी जो कोणी आमच्यासोबत..."; मनसे-शिवसेना युतीवर आदित्य ठाकरेंचे सुचक विधान

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसे व शिवसेना (ठाकरे) हे पक्ष एकत्र येण्याबाबत सूचक वक्तव्य केले होते. त्यानंतर या दोन पक्षांच्या युतीची चर्चा सुरू झाली होती. पाठोपाठ शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील मनसेसोबतच्या युतीवर सकारात्मक प्रतिसाद दिला. आता उद्धव ठाकरे यांचे पुत्र आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी देखील मनसेला युतीबाबत सूचक विधान केले आहे. आदित्य ठाकरे यांच्याबरोबरच शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत, आमदार अनिल परब, आमदार अंबादास दानवे, आमदार सुनील प्रभू यांनी देखील वारंवार युतीबाबत अनुकूलता दर्शवली आहे.

### आमचे मन साफ

यावेळी आमदार आदित्य ठाकरे म्हणाले, आम्ही आमच्याकडून प्रतिसाद दिला आहे. आमची भावना व्यक्त केली आहे. मराठी माणूस व महाराष्ट्राच्या हितासाठी जो कोणी आमच्यासोबत यायला तयार असेल, त्यांना आम्ही बरोबर घेऊन महाराष्ट्र हितासाठी लढत राहू. अलीकडेच आमचे नेते दीपेश म्हात्रे व मनसेचे नेते राजू पाटील यांनी एकत्र येऊन आंदोलन केले. हे त्याचेच उदाहरण आहे. लोकांच्या मनात काय आहे हे आम्हाला माहिती आहे आणि आमचे मन साफ आहे. जो कोणी नेता महाराष्ट्र हितासाठी आमच्याबरोबर यायला तयार असेल, जो पक्ष पुढे येत असेल, आम्ही त्यांच्याबरोबर एकत्र येऊन लढू, असे आदित्य ठाकरे यांनी नमूद केले.

### सर्वांच्या मनातली बातमी लवकरच कळेल

शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी देखील यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, " युतीच्या चर्चेवर कोणीही मौन बाळगलेले नाही. स्वतः मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी त्यांच्या मनातली इच्छा व्यक्त केली आहे, त्यांच्या सहकाऱ्यांनी नव्हे. राज ठाकरे यांच्या इच्छेवर त्यांचे बंधू उद्धव ठाकरे यांनी देखील अनुकूल भूमिका घेतली आहे. त्यानंतर आम्ही सर्वांनी देखील योग्य भूमिका घेतल्या आहेत. त्यामुळे तुमच्या सर्वांच्या मनातली बातमी तुम्हाला लवकरच कळेल".

### ठोस कृती करायला हवी

दरम्यान, माझ्या माहितीप्रमाणे अद्याप कोणताही प्रस्ताव मनसेकडे आलेला नाही. जर प्रस्ताव आला, तर त्यावर राज ठाकरे निर्णय घेतील. आम्ही सकारात्मक आहोत, हे केवळ बोलून चालणार नाही, खरेच सकारात्मक असतील, तर त्याबाबतची ठोस कृती करायला हवी. कृती कुठेही दिसत नाही. नुसती बोलाची कढी अन् बोलाचा भात असे सुरू आहे. प्रत्यक्ष कृती होताना दिसत नाही. कृती झाली तर राज ठाकरे निर्णय घेतील. ठाकरे ब्रँड संपवायचा कुणीही प्रयत्न केला, तरी जोपर्यंत राज ठाकरे आहेत, तोपर्यंत ठाकरे ब्रँड संपवू शकत नाही, असे संदीप देशपांडे यांनी म्हटले होते.

शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

**सम्पादकीय**

# सायबर फसवणुक; जागरूकतेला पर्याय नाही

सायबर आर्थिक फसवणुकीचे संकट दिवसेंदिवस अधिकाधिक तीव्र होत आहे. भारतीय सायबर अपराध समन्वय केंद्र (इंडियन सायबर क्राईम को ऑर्डिनेशन सेंटर) च्या अनुसार २०२४ च्या पहिल्या सहामाहीतच सायबर आर्थिक फसवणुकीचा आकडा सुमारे काही हजार कोटी रुपये इतका होता. हे केंद्र, केंद्र सरकारच्या अखत्यारीत येते. केंद्र सरकारने अशा प्रकारच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी 'ई-झिरो एफआयआर प्रणाली' निर्माण केली असून, दिल्लीमध्ये ती प्रायोगिक तत्वावर अंमलात आणली गेली आहे. याशिवाय बँका, सरकारी विभाग, सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि सायबर तज्ज्ञ लोकांना नेहमीच सावध आणि सजग करतात. त्यांनी दिलेल्या सल्ल्यांचे फलक लावले जातात. प्रभावशाली व्यक्तींबरोबर लोकांना जागरूक करणार्या जाहिराती केल्या जातात. त्या वारंवार प्रसारित होतात. तुमचे पासवर्ड कोणाला सांगू नका, बँका त्यांच्या ग्राहकांची फोनवरून चौकशी करत नाहीत किंवा कोणतीही वैयक्तिक माहिती विचारत नाहीत. मोफत भेट अशा ऑनलाईन अमिषाला बळी पडू नका, हे त्यापैकी काही सामान्य कानमंत्र आहेत. याशिवाय माहित नसलेल्या क्रमांकावरून आलेला फोन शक्यतो उचलू नका, अनोळखी मेल उघडू नका, अशा कोणत्याही लिंकवर क्लिक करू नका, असे आवाहन नेहमीच केले जाते. हे कानमंत्र लक्षात ठेऊन अंमलात आणणे अजिबात अवघड नाही किंवा ते लक्षात राहू नयेत असेही नाहीत. तरीही लोक त्याच त्याच चुका वारंवार करताना आढळतात. असे का घडते? कोणतीही सरकारी बँक किंवा संस्था दामदुप्पट आर्थिक परतावा किंवा नियमबाह्य व्याज देत नाही. असे करणे शक्य असते तर ते या संस्थांनी केलेच असते. निसर्गात पैशांचा पाऊस कधीही पडत नाही. तो कोणीच पाडू शकत नाही. तरीही माणसे अशा गोष्टींना भुलतात. बहुसंख्य सामान्य माणसांची आर्थिक परिस्थिती साधारण असते. त्यामुळेच त्यांच्या आर्थिक गरजा अपूर्ण राहू शकतात हे खरे.

तथापि गरज आणि हाव यातील फरक लोक विसरत चालले असावेत का? 'नको रे मना द्रव्य ते पुढीलांचे' असे समर्थ रामदास स्वामींनी बजावले आहे. अती हाव, स्वार्थ बुद्धी आणि कमी कष्टात जास्तीच्या मोबदल्याची अपेक्षा यामुळे माणसांना या शिकवणुकीचा वा मूल्यांचा विसर पडत चालला असावा. पण ही वृत्ती आता माणसांच्याच मुळावर उठत आहे. ऑनलाईन आर्थिक फसवणुकीला माणसे बळी पडत आहेत. असे न होणे ही लोकांची देखील जबाबदारी आहे. इंटरनेट सुविधा वापरायच्या. एका क्लिकवर कामे करायची. सायबर क्रांतीचा फायदा घ्यायचा. पण त्यातील काही कळत नाही, आम्ही कसे फसलो हेच समजत नाही हेच म्हणत राहायचे. असा दुटप्पी दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. सायबर आर्थिक फसवणुकीला आळा घालायचा असेल तर लोकांच्या किमान आर्थिक साक्षरतेला पर्याय नाही.

# संभाजी महाराज यांचे विचार व पराक्रम तळागाळापर्यंत पोहचवणे हेच आपले एकमेव ध्येय - प्रणेता देसले

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------





धर्मवीर संभाजी महाराज यांचे विचार व पराक्रम तळागाळापर्यंत पोहचवणे हेच आपले एकमेव ध्येय असे प्रतिपादन धर्मवीर संभाजी महाराज स्मारक समिती दहीवेलचे सचिव प्रणेता देसले यांनी केले. दहिवेल येथील सामाजिक कार्यकर्ते तथा खान्देश प्रतिष्ठानचे अध्यक्ष व धर्मवीर संभाजी महाराज स्मारक समितीचे सचिव प्रणेता देसले यांच्या तर्फे दरवर्षी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात त्या अंतर्गत त्यांनी आतापर्यंत अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत जसे साक्री एस. टी. आगारातील गॅरेज मधील कष्टकरी मेकॅनिकल, चालक, वाहक, कंट्रोल कॅबिन मधील कर्मचारी, लोटगाडी वर व्यवसाय करणारे बांधव, भाजीपाला विक्रेते व व्यावसायिक बंधू यांना थंडगार पाणी बॉटल वाटप केलेले आहेत एस. टी. आगारातील गॅरेज मधील कष्टकरी मेकॅनिकल, चालक, वाहक, कंट्रोल कॅबिन मधील कर्मचारी, लोटगाडी वर व्यवसाय करणारे बांधव, भाजीपाला विक्रेते व व्यावसायिक बंधू साक्री शहरात उन्हातान्हात दिवसभर व्यवसाय करतात व जनतेला सेवा पुरवतात. सदर उपक्रम राबविण्याचा प्रमुख उद्देश म्हणजे यापुढे शिवभक्तांनी संभूभक्तांनी आदरणीय धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार तळागाळातील प्रत्येक व्यक्तीच्या मनामनात, रक्ताच्या थेंबाथेंबात व प्रत्येक माणसाच्या हृदयात पोहचवण्याचे काम करायला पाहिजे व शक्य होईल त्या पद्धतीने धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंती दिवशी सामाजिक उपक्रम राबवण्याची पद्धत रुजवायला पाहिजे. छत्रपतींच्या विचाराने सर्वांनी हा महाराष्ट्र पुढे नेण्याची सध्याच्या काळात गरज आहे त्यामुळे सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सर्व शिवभक्तांना व संभूभक्तांना प्रयत्नशील राहावे लागेल व त्या दृष्टीने वाटचाल करावी लागेल हाच खरा उद्देश सदर उपक्रम राबविण्याचा मागचा राहतो असे सामाजिक कार्यकर्ते प्रणेता देसले यांनी सांगितले तसेच भविष्यात देखील धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंती दिवशी आपण वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवू असा प्रणेता देसले यांनी संकल्प केला आहे. तसेच धर्मवीर संभाजी महाराज स्मारक समितीचे सचिव प्रणेता देसले यांच्या तर्फे ह्या वर्षी देखील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने स्वराज्य सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते त्या अंतर्गत प्रणेता देसले यांच्या वतीने धुळ्यातील प्रसिद्ध पंजारापोळ गोशाळा येथे गोसेवा करण्यात आली तसेच हात कामगारांना एक्कावन किलो फरसाण वाटप करण्यात आले या अभिनव उपक्रमाची राज्यभर चर्चा होत आहे. धर्मवीर संभाजी महाराज यांचे विचार व पराक्रम तळागाळापर्यंत पोहचवणे हेच आपले एकमेव ध्येय असे प्रतिपादन धर्मवीर संभाजी महाराज स्मारक समिती दहीवेलचे सचिव प्रणेता देसले यांनी केले.

# पर्ल हार्बरच्या हल्याची पुनरावृत्ती युक्रेनने केल्याने तिसऱ्या महायुद्धाचा धोका!

दिनांक १ मे २०२५ ला युक्रेनने रशियावर केलेला हल्ला हा ८४ वर्षेपुर्वी झालेल्या पर्ल हार्बर हल्याप्रमाणे असल्याचे गनल्या जात आहे. कारण ७ डिसेंबर १९४१ ला अमेरिकेच्या पर्ल हार्बरवर जापानने सकाळी ७ वाजुन ४८ मिनिटांनी अचानक हल्ला केला व हा हल्ला फक्त ७ सेकंदाचा होता तसाच हल्ला युक्रेने रशियावर करून तिसऱ्या महायुद्धाचा आलाराम वाजविल्याचे दिसून येते.युक्रेनच्या हल्ल्याला संपूर्ण जग ऐतिहासिक पर्ल हार्बरच्या हल्लाशी जोडत आहे त्यामुळे येणारा काळात रशिया कठोर पाऊल उचलुन भयावह रूप धारण करू शकतो आणि त्याची ठीणगी रशिया-युक्रेन संघर्ष तिसऱ्या महायुद्धाकडे वाटचाल करताना दिसत आहे.पर्ल हार्बरच्या हल्लामध्ये जापानने अमेरिकन नेवी बेसवर हल्ला करून अमेरिकेचे १८८ एअरक्राफ्ट उध्वस्त केले,एक डझनभर युध्दपोत उध्वस्त झाले, कीतीतर जहाज समुद्रात डुबले व अमेरिकेचे ३६०० सैनिक मारल्या गेले.यामुळे अमेरिकेच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि हिरोशिमा आणि नागासाकी वर अनुबॉम्ब टाकून पर्ल हार्बरचा बदला घेतला. त्यामुळे युक्रेनच्या रशियावरील हल्लाने जगात तिसऱ्या महायुद्धाची परिस्थिती निर्माण झाली आहे.कारण १ जून २०२५ ला युक्रेनने रशियावर असा हल्ला केला की,त्याची कल्पना जगातील देशांनी किंवा रशियाने सुध्दा कधीच केली नसेल.युक्रेनने रशियामध्ये ४ हजार किलोमीटर आत कंटेनरमधून ड्रोन रशियाच्या आतील भागात नेण्यात आले आणि आत घुसून थेट रशियाच्या सैन्य स्थळावर हल्ला केला यात ४ एअर बेस व १ नेव्ही बेस उध्वस्त करून युक्रेनने रशियाला जबरदस्त धक्का दिला आहे.यात सैबेरियातील बेलाया, फिनलंडजवळील ओलेन्या, मास्कोच्या पूर्वेकडील इव्हानोव्हो आणि द्यागिलेव्हो हवाई तळ लक्ष्य केले.या हल्लात नष्ट करण्यात आलेल्या विमानांमध्ये टीयू-९५, टीयू-२२ सारख्या मोठ्या बॉम्बर्स,एम- ३ या विमानासह ए-५० ही महागडी हेर विमाने नष्ट केली आहे.ए-५० विमाने खूपच दुर्मिळ आहेत व रशियाकडे ही फक्त १० आहेत.एक विमान ३ हजार कोटी रुपयांचे आहे.या हल्यात रशियाची दोन अब्ज डॉलर किंमतीची विमाने नष्ट झाली आहे.त्यामुळे हा हल्ला पर्ड हार्बर सारखा समजल्या जात आहे.युक्रेनने रशियाचे ५ सैन्य ठिकाणे उध्वस्त केलेच सोबतच शनिवारी रात्री रशियातील भीषण स्फोटात दोन पूल उध्वस्त झाले.त्यामुळे दोन रेल्वे घसरून ७ जणांचा मृत्यू झाला अनेक गंभीर जखमी झाले.युक्रेन सीमालगत ब्रायन्स्क भागात असलेला पूल स्फोटामुळे एका प्रवासी रेल्वेवर कोसळला यात अनेक प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भिती व्यक्त होत आहे. अशाप्रकारे युक्रेन-रशिया चिंगारी आगीचा गोळा बनण्याची दाट शक्यता आहे.पर्ल हार्बरवर जपानने हल्ला केल्यावर, अमेरिकेने जपानविरुद्ध युद्ध घोषित केले. या हल्ल्यामुळे अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात सक्रियपणे भाग घेतला.६ ऑगस्ट १९४५ ला अमेरिकेने हिरोशिमा शहरावर "लिटिल बॉय" नामक परमाणु बॉम्ब टाकला या विध्वंशकारी स्फोटात हिरोशिमा शहरचा ७० टक्के भाग उध्वस्त झाला व यात १ लाख ४० हजार नागरिक मारल्या गेले.तीन दिवसांनंतर ९ ऑगस्ट १९४५ ला अमेरिकेने नागासाकी शहराव "फैट मैन" नामक दूसरा परमाणु बॉम्ब टाकला यामध्ये नागासाकी शहरातील ५० टक्के हिस्सा उध्वस्त झाला व ७४ हजार नागरिक मारल्या गेले. हिरोशिमा व नागासाकीवर परमाणु बॉम्ब वर्षावानंतर शक्तीशाली जापानने दुसऱ्या महायुद्धात आत्मसमर्पण केले.अमेरिकेचा महत्वाचा उद्देश होता की परमाणु बॉम्बचा उपयोग करून युद्ध ताबडतोब थांबवीने आवश्यक होते.त्यामुळे आता दुसऱ्या महायुद्धाची पुनरावृत्ती होते की काय अशी शंका वर्तवली जात आहे.कारण रशियाचे पाच एअरबेस युक्रेनने नष्ट केल्याने त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे त्यामुळे रशिया केव्हा काय करेल हे सांगणे कठीण आहे.सध्याच्या परिस्थितीत युक्रेनला अमेरिका व नाटो देश संपूर्ण शक्तीनीशी मदत करीत आहे त्यामुळेच युक्रेनचा रशियावरील हल्ला सक्सेस झाला. याकरीता पुढील काळ भयावह रूप धारण करू शकते. रशिया-युक्रेनचा वाढता संघर्ष पहाता व रशियाच्या वायुतळावर केलेल्या भीषण हल्ल्यानंतर तुर्कीची राजधानी इस्तंबूल येथे दिनांक २ जुन २०२५ ला झालेली दोन्ही देशांमधील शांतता चर्चा निष्फळ ठरल्याचे सांगितले जात आहे.म्हणजेच येणाऱ्या काळात रशिया आक्रमक पाऊल उचलुन काहीही करू शकतो याला नाकारता येत नाही.

--------------------------------------

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**नागपूर.**

# विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी सुरू केली अनोखी चळवळ

## 'जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह' – शैक्षणिक, सामाजिक उपक्रमांना दिशा देणारे व्यासपीठ )

संतोष मोहिते
विशेष प्रतीनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------




नाशिक शहरात विद्यार्थी-संचलित उपक्रमांच्या क्षेत्रात एक नवीन अध्याय सुरू झाला आहे. दहावी वर्गात शिकणाऱ्या काही होतकरू विद्यार्थ्यांनी मिळून 'जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह, नाशिक' या संघटनेची स्थापना केली आहे. या संघटनेतर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वयंसेवक व प्रतिनिधी निवड मोहीम राबवली जात आहे, ज्यामध्ये इयत्ता ८वी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे.

**विद्यार्थी-संचलित, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम**

या समूहाची स्थापना करणाऱ्या दहावीतील विद्यार्थ्यांचा मुख्य उद्देश गरजू व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी काहीतरी विधायक करण्याचा आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी इयत्ता नववी व दहावीच्या गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. या सामाजिक उपक्रमास *शिवसेना (शिंदे गट) नाशिकचे महानगरप्रमुख मा. प्रविण (बंटी) तिदमे* यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. त्यांच्या पाठिंब्यामुळे या उपक्रमाला नवी दिशा मिळाली आहे. सदरील उपक्रमांमधून सुमारे ५०० विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळणार आहेत.

**व्यक्तिमत्त्व विकासाला चालना**

या समूहाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक भान, संवाद कौशल्य व आत्मविश्वास निर्माण करणे हा आहे. समूहाच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, टीमवर्क उपक्रम आणि करिअर मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.

उपक्रमाची मुख्य वैशिष्ट्ये:

- पूर्णतः मोफत सहभाग – कोणतेही शुल्क नाही
- नेतृत्व, संवाद, संघटन, नियोजन यांचा व्यावहारिक सराव
- सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग
- वक्तृत्व, निबंध, टीमवर्कसारख्या कौशल्यांना वाव
- सहभागासाठी प्रमाणपत्र व विशेष सन्मान
- करिअर मार्गदर्शन शिबिरे
- पालकांसाठी समाधानकारक आणि विधायक पर्याय

**तरुणांना योग्य दिशा**

आजच्या युगात मुले मोबाईल, सोशल मीडिया किंवा चुकीच्या संगतीच्या प्रभावाखाली असतात. अशा वेळी या प्रकारचे विद्यार्थी-संचलित उपक्रम त्यांना योग्य दिशा देण्यास उपयुक्त ठरतात. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना केवळ सामाजिक भानच नव्हे तर कलागुणांना वाव मिळेल, एक सकारात्मक व्यासपीठ उपलब्ध होईल आणि नव्या दिशेने स्वतःला घडवता येईल.

**मोफत पाठ्यपुस्तक वितरण उपक्रम**

लवकरच राबविण्यात येणाऱ्या मोफत पाठ्यपुस्तक वितरण उपक्रमामध्ये निवड झालेल्या स्वयंसेवकांना विशेष भूमिका मिळणार आहे. या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळणार आहे.

**पालक व विद्यार्थ्यांना आवाहन**

नाशिकमधील सर्व विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेऊन सहभाग नोंदवावा असे आवाहन समूहाच्या वतीने करण्यात आले आहे. इयत्ता ८वी ते १२वी मधील सर्व विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होऊ शकतात.

**संपर्क माहिती:**

चि. प्रसाद अरविंद भालेकर
समूहप्रमुख – जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह, नाशिक
मोबाईल: ९५२९१९५६८८

या उपक्रमाने नाशिकमधील शिक्षण क्षेत्रात एक नवीन आशेचा किरण पेटवला आहे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक नवीन मार्ग मोकळा केला आहे.


शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७



अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर, जाहिरात प्रतिनिधी, गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# एक विदारक पूर्ण सत्य



आयुष्याच्या प्रवासात . . ऐन तारुण्याच्या उंबऱ्यावरील, मनाच्या रंगमंचावर, माणूस अनेक नाटकं रंगवत असतो. कधी सुखाचे अनाहुत प्रसंग वाटेस येतात !, तर कधी, कधीतरी दुःखाच्या गडद छायांचे प्रवेश रसिक मनावर राज्य करून जातात. तेव्हा रसिकांची मिळालेली दाद , हार, फुले तुरे, मान सन्मान पुरस्कार स्विकारतो, तेव्हा त्याचे मन माणसांच्या गोतावळ्यात, प्रसिद्धीच्या झोतात असते. आणि जेव्हा आयुष्याच्या संध्याकाळच्या प्रवासातील, वार्धक्यातला शारिरीक वेदणांचा खेळ हाऊसफुल होतो, तेव्हा बहुधा काहींच्या जवळ कुणी नसतं ! गर्दी होते ती त्याच्या संपूर्ण आयुष्याच्या नाटकाचा शेवटच्या खेळातील, शेवटच्या प्रवेशातील, आखरी प्रसंगातील, त्याची अंगावर पडतात तेव्हा तो पाहायला ह्या मायावी रंगमचावर नसतो. केवळ आणि केवळ त्याचे निर्जीव कलेवर विना श्रृंगाराचे पडलेले असते. माणूस आयुष्यभरातील प्रापंचिक नाटकात, कधी लेखक, कवी, कलाकार कधी तर कधी कधी प्राप्त परिस्थितीत, कामाचा जो रोल आपल्या वाटेला येतो, तेव्हा तो मनाने जीव ओतून करत असतो. . . तेव्हा तो सर्व मनाने अनुभवत असतो,... पाहात असतो. आयुष्याच्या संसारूपी नाटकाचा शेवटच्या अंकाचा शेवटच्या प्रवेशाचा पडदा पडला की, . . . . . संसाराच्या मायावी रंगमंचावर भयाण अंधार पसरतो. तेव्हा खोल मनाच्या गुहेतील आत्मा कलेवर सोडून परमात्म्यात विलीन झालेला असतो. ते कलेवर आत्म्याविना निपचित पडून असते, हेच माणसाच्या आयुष्याचे शेवटचे अंतिम पूर्ण सत्य आहे.

-------------------------

लेखक
गावगाडाकार
साहेबराव नंदन
(तात्या) ताहाराबादकर

# बदलत्या काळानुसार शिक्षण देणाऱ्या शाळेची निर्मिती

## शारदा इंग्लिश स्कूल, हाणेगावच्या उद्घाटन प्रसंगी मान्यवरांनी केले अभ्यासपूर्ण मार्गदर्शन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------



बदलत्या काळानुसार बदलती आव्हाने लक्षात घेऊन व शिक्षणात होणारे नवनवीन बदल समजून घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींचे विचार करून हाणेगाव परिसरामध्ये शारदा इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून समृद्ध व उज्वल भविष्य पिढी घडवण्याच्या दृष्टिकोनातून या नव्या शाळेची सुरुवात होते आहे आणि शाळा अल्पावधीतच नावारूपात येईल असे गौरवोद्गार असे उद्घाटन सोहळा व पालक मार्गदर्शन मेळाव्याप्रसंगी अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. पालक मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले उपविभागीय अधिकारी मा. अनुपजी पाटील यांनी विद्यार्थ्यांना समजून घेत त्यांच्यात स्पर्धात्मक परीक्षेची व अभ्यासाची गोडी तयार करत त्यांना उत्तमोत्तम शिक्षण द्यावे याबाबत अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. शिक्षणतज्ञ एच एस खंडागळे सरांनी प्रत्येक मूल हा या देशाचा जबाबदार व समृद्ध नागरिक म्हणून विकसित व्हावा व त्यासाठी शिक्षक आणि शिक्षणाचे अत्यंत मोलाचे स्थान असल्याचे विषद केले. उद्घाटक गुरुवर्य श्री शंकर लिंग शिवाचार्य महाराज हाणेगावकर यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन करताना शाळेच्या सर्व संचालकांनी अत्यंत मेहनतीने शाळा सर्वोत्तम बनवण्यासाठी परिश्रम घ्यावेत यश नक्कीच मिळेल असा विश्वास दाखवत शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी हभप हाणमंत महाराज कंठाळीकर व सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर यांचीही यथोचित भाषणे झाली. आणि आम्रपाली येसगे मॅडम व आराध्या पडकंठवार यांनी आपले शैक्षणिक अनुभव सांगितले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून देगलूरचे तहसीलदार भरतजी सूर्यवंशी सरपंच शारदादेवी राठोड, जिपचे माजी उपाध्यक्ष रमेश देशमुख शिळवणीकर, एडवोकेट प्रीतम देशमुख, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, माजी जि प सदस्य दिलीप बंदखडके, माजी सभापती विवेक पडकंठवार, बाबू पाटील खुतमापूरकर, किशन महाराज मरतोळीकर, बालाजी पाटील इंगळे, डॉ व्यंकट धुमाळे, डॉ धमनसुरे, डॉ शेरीकर, माधवराव देशय घुळेकर, उपसरपंच मुजिपोद्दीन चमकुडे, नागनाथ टोंपे, माधव फुलारी, विठ्ठल रेड्डी, शिवकांताप्पा माळगे, पत्रकार महादेव उप्पे, शशीकांत पटणे, रमाकांत फुलारी, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी आडेकर, प्रकाश काळे, वैजनाथ बत्तीनवार, वसंत आडेकर, यादवराव सुर्यवंशी व अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय भालके, राजेश पंदरगे, दत्तात्रय इंगळे खुतमापूरकर, कैलास येसगे कावळगावकर, प्रा. प्रभाकर भालके, प्रवीण इनामदार, संदिप चलवे, सुनिल मंडलापूरे, दिलीप पाटील, सादिक अत्तार, दीपक रेड्डी, असद तांबोळी, माधव येसगे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कैलास येसगे कावळगावकर यांनी तर सूत्रसंचालन सरपंच बालाजी चोपडे यांनी केले.

# नांदगाव मनमाड साठी ५ कोटीचे क्रीडा साहित्य

## शिवसेना आ. सुहास कांदे यांच्या प्रस्तावास क्रिडा मंत्री ना. दत्तात्रय भरणे यांची मान्यता

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



नांदगाव विधानसभा मतदारसंघातील विविध क्रीडा विषयांवर आज मुंबई येथे आ. सुहास कांदे यांची महाराष्ट्र राज्याचे क्रीडा मंत्री मा. श्री. दत्तात्रय भरणे साहेब यांचे बरोबर बैठक संपन्न झाली. या बैठकीत नांदगाव मनमाड येथील क्रीडा संकुलात विविध क्रीडा साहित्य व सोयी सुविधांसाठी ५ कोटींच्या प्रस्तावास मंत्री महोदयांकडून मान्यता देण्यात आली. यावेळी आ. सुहास कांदे यांनी नांदगाव विधानसभा मतदारसंघातील असंख्य विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रीडा क्षेत्रात उत्तुंग यश मिळवल्याची माहिती क्रीडा मंत्री महोदयांना दिली. विशेष सुविधा नसतानाही मतदारसंघातील खेळाडूंनी मोठे प्राविण्य मिळवलेले आहे, म्हणूनच विविध क्रीडा प्रकारांचे साहित्य व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याकरिताचा प्रस्ताव सादर करण्यात आला. मतदार संघातील नांदगांव हे तालुक्याचे ठिकाण असलेले शहर असुन येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्यात आले आहे. परंतु या क्रीडा संकुलमध्ये अनेक अडचणी असुन खेळाडूंना प्रशिक्षण घेण्यासाठी व सराव करण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध नाही, तसेच नांदगांव तालुक्यातील मनमाड हे एक ते दीड लाख लोकसंख्या असलेले शहर असुन मनमाड येथिल महर्षी वाल्मिकी स्टेडीयम मध्ये योग्य त्या सोयी सुविधा पाहिजे , नांदगांव व मनमाड येथे कबड्डी, कुस्ती यांसारख्या खेळांचे मोठ्याप्रमाणात आयोजन केले जात असुन तालुक्यात अनेक खेळाडू आहे. परंतु या खेळाडूंना सरावासाठी योग्य सोयीसुविधा पाहिजे आहेत. नांदगांव येथे तालुका क्रीडा संकुल मधील कामे करणे ' विविध खेळांची मैदाने, जॉगिंग ट्रॅक, जिम, क्रीडा संकुलाच्या जागेला संरक्षक भिंत, कार्यालयीन इमारत, ड्रेनेज, कुस्ती मॅट, टेबल टेनिस हॉल व टेबल, सोलर पॅनल बसविणे तसेच मनमाड येथे खेळांच्या कोणत्याही विशेष सुविधा उपलब्ध नसतांना देखील मनमाड शहरातील अनेक खेळाडूंनी भारोत्तोलन (वेटलिफ्टिंग) सारख्या खेळात प्राविण्य मिळविले असुन राष्ट्रीय तसेच अंतरराष्ट्रीय स्तरावर नावलैकिक मिळविला आहे. तसेच कबड्डी व कुस्ती खेळांचे देखील अनेक खेळाडू आहे. त्यामुळे मनमाड महर्षी वाल्मिकी स्टेडीयम येथे इनडोअर व्यायामशाळा, ज्युडो कराटे कुस्ती, बॅडमिंटन, टेबल टेनिस, चेस, कबड्डी, जीमनास्टिक या इनडोअर खेळांचे साहित्य गॅलरीसाठी खुर्चा, तसेच फुटबॉल, क्रिकेट, बास्केटबॉल, हर्डल, आर्चरी, ५० फुट उंच रॉक क्लाईंनिंग वॉल व त्यासाठी लागणारे साहित्य, पुरुषांसाठी व महिलांसाठी ग्रीनजिम, पुरुषांसाठी योगा व हास्यक्लबसाठी लॉन, स्त्रीयांसाठी योगा व हास्यक्लबसाठी लॉन, ४०० मित्र सिंथेटिक ट्रॅक च्या आतील बाजूस आर्टीफिशियल लॉन यांसारख्या आउट डोअर खेळांचे साहित्य व छतावर सोलर पॅनल बसविण, जलतरण तलाव येथे महिलांसाठी इनडोअर जिम, महिलांसाठी योगा मेडिटेशन हॉल बांधणे व त्याअनुषंगिक कामे, सोलर पॅनल बसविणे, मनमाड येथिल डी. के. पगारे क्रीडा संकुल येथे इनडोअर कबड्डी साहित्य, खेळाडूंसाठी ग्रीन जिम, इनडोअर व्यायाम साहित्य व तर अनुषंगिक कामे करणे, सोलर पॅनल बसविणे गरजेचे आहे. या बैठकीस महाराष्ट्र राज्याचे क्रीडा मंत्री ना. दत्तात्रय भरणे, आ. सुहास कांदे, क्रीडा आयुक्त, संबंधित खात्याचे अधिकारी उपस्थित होते

# 5 जुन जागतिक पर्यावरण दिवस

## बदलत्या हवामानामुळे पर्यावरणाची स्थिती ढासळली!

करोना महामारीच्या दुसऱ्या लाटेने "ऑक्सिजनची" परीभाषा काय आहे हे जगाला दाखवून दिले.त्यामुळे सावधान! ऑक्सिजनची पुर्ती करण्यासाठी "पर्यावरणाला" वाचवीने अत्यंत गरजेचे आहे.कारण आज आपण बदलत्या हवामानामुळे पर्यावरणात झालेल्या बदलांचे प्रायचित्य भोगतो आहे.प्रदुषणावरील समस्येवर १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने स्टाकहोम (स्विडन) इथे जगातील पाहीले पर्यावरण सम्मेलन आयोजित केले.यामध्ये ११९ देशांनी भाग घेतला होता व सर्वांनीच पृथ्वीच्या सिध्दांताला मान्यता दिली व दर वर्षी ५ जुन पर्यावरण दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा करण्यात आली व ५ जुन १९४७ ला पहीला "जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला".आज संपूर्ण जगात पर्यावरणाच्या बाबतीत असमंजस्यतेचे वातावरण निर्माण झाले आहे.प्रत्येक देश सर्वांनाच सांगतो की पर्यावरण वाचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.तरीही जगातील अनेक देश अत्याधुनिक शस्त्रस्पर्धेत आप-आपले शक्ती प्रदर्शन मोठ्या प्रमाणात करतांना दिसतात. यामुळे प्रदूषणात व तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होवून पर्यावरणावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.याचा परिणाम आज तिसऱ्या महायुद्धाकडे जातांना दिसतो.आज युक्रेन - रशिया युद्ध व इजरायल-हमास-ईरान युद्धामुळे अनेक भाग आगीत भस्मसात झाला आहे.त्यामुळे बलाढ्य देशांनीच पर्यावरणाची गळचेपी केल्याचे दिसून येते.अमेरिका, नाटो देश, चीन, उत्तर कोरिया, रशिया, ब्रिटन, इजरायल यांनी पर्यावरणाला कोसो दूर नेवून ठेवले आहे ही समजदार आणि बलाढ्य देशांची शोकांतिकाच म्हणावी लागेल. आपण दुसऱ्या महायुद्धातील हिरोशिमावर टाकलेल्या अणुबॉम्बचे मृत्यूचे तांडव पहाले तरीही प्रत्येक देश पर्यावरणाला बाजूला सारून अणुबॉम्बची भाषा करतात हे जगाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.परंतु आज अक्षरशः युक्रेनने १ जुन २०२५ ला रशियाचे ५ एअर बेस उध्वस्त केले व रशियावर पर्ल हार्बर सारखा अट्याक करून रशियाला तिसऱ्या महायुद्धासाठी उकसविल्याचे दिसून येते.कारण आज प्रत्येक देश निसर्गाच्या हिरव्यागार गालीच्यावर बसण्यापेक्षा बारूदच्या ढीगाऱ्यावर बसण्याचे जास्त पसंत करतांना दिसतो.कारण अत्याधुनिक शस्त्र स्पर्धेत सर्वच अव्वल येण्यासाठी प्रत्येक देश कसोटीचे प्रयत्न करीत आहे. त्यामुळे पुढे चालून बारूदचा ढीगारा संपूर्ण पृथ्वीला आगीच्या खाईत लोटु शकते.त्यामुळे सावधान जगातील देशांनो बारूदच्या ढीगाऱ्यावर लक्ष न देता पर्यावरणावर लक्ष दिले पाहिजे.कारण वाढत्या तापमानामुळे मे २०२४ ला भारताची राजधानी दिल्ली येथील तापमान सर्वाधिक ५२.३ अंश सेल्सिअस होते यावरुन आपण समजू शकतो की पुढे तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होवू शकते याला नाकारता येत नाही.आज जगात मोठ्या प्रमाणात शहरीकरण, औद्योगीकीकरण व सिमेंट रोडचा विस्तार झाल्यामुळे पर्यावरण डगमगतांना दीसत आहे.ढासळत्या पर्यावरणामुळे सुर्य आग ओकत आहे.२०१९ मध्ये राजस्थान मधील चुर आणि श्रीगंगानगर येथे तापमान ५० डीग्री सेल्सिअस पार गेल्याने भारतातील पर्यावरण रेड झोनमध्ये होते ही अत्यंत चिंतेची व गंभीर बाब आहे.२६ मे २०२० ला इराकमधील तूज या शहरात जगभरातील उच्चांकी ५०.५ अंश सेल्सिअस होते. भारतात मे २०२४ मध्ये दिल्लीतील तापमान ५२.३ अंश सेल्सिअस वर गेले होते.यामुळे वाढते तापमान पृथ्वीसाठी, मानव, जीवजंतू, पशुपक्षी या सर्वांसाठी आगीचा गोळा बनल्याचे दिसून येते. वाढता तापमानातील बदल हा मानवाच्या अतीरेकामुळे व अहंकारामुळे निर्माण होत आहे.याचा सरळ परिणाम पर्यावरणावर होत असुन त्याचा ह्रास होत आहे.२०१९ मध्ये बंगालमध्ये आलेल्या "अम्फान" चक्रीवादळाने १०० हुन अधिक लोकांचा बळी गेला व मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी सुध्दा झाली.यानंतर "तौक्ते व "यास" चक्रीवादळाने हाहाःकार माजवीला.म्हणेज दरवर्षी दिवसेंदिवस वेगवेगळे चक्रीवादळ उग्ररूप धारण करतांना दिसते. मानवाने पर्यावरणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे ह्या संपूर्ण विनाशकारी नवीन-नवीन घटना पहायला मिळतात.याकरीता मानवाने पर्यावरणाची जोपासना करण्याची गरज आहे.आज जगात मोठ्या प्रमाणात प्रदुषण वाढत आहे. त्यामुळे पृथ्वीतलावरील ऑक्सिजनची मात्रा दीवसेंदीवस कमी होतांना दिसत आहे. याचे उदाहरण आपणाला करोना काळात चांगल्याप्रकारे ग्यात आहे.यामुळे अनेक प्रकारचे नवीन-नवीन आजार उदयास येताना दीसतात.आज पर्यावरणाचे संतुलन विस्कळीत झाल्यामुळे व मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाल्यामुळे जंगलातील हिंसक पशु शहरांकडे शिरकाव करतांना दिसतात. यामुळे मानवीय हानी मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो. यामुळेच मानव व पशु यांच्यात शत्रृत्वाची भावना निर्माण झाली आहे.आज प्रदुषणामुळे अनेक पशु-पक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते."गिधाड हा पक्षी" पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून एक महत्त्वाचा घटक आहे.परंतु प्रदुषणामुळे गिधाडांची संख्या कमी झाल्याचे दिसून येते.अशा प्रकारे अनेक पशु-पक्षांना प्रदुषणामुळे आपले प्राणसुध्दा गमवावे लागतात. पर्यावरणाला वाढविण्याकरिता मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याची गरज आहे.वाढते शहरीकरण व औद्योगीकीकरण यांना कुठेतरी अंकुश लावला पाहिजे आणि मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे.आज प्रदुषणामुळे व ग्लोबल वॉर्मिगमुळे मोठ्या प्रमाणात ग्लेशिअर वितळत आहे, समुद्राच्या पाण्याची पातळी दीवसें-दीवस वाढतच आहे, शहरीकरण, औद्योगीकीकरण व खनण प्रक्रियेमुळे जमीनिचा भुभाग निकामी होत आहे.यामुळे जगात ज्वालामुखीचा उद्रेक, वनवा लागुन जंगल संपदा नष्ट होने,भुकंप, सुनामी,अम्फान तुफान,अती पाउस,अती उष्णता,अती थंडी,अवकाळी पाऊस,विजापडुन मृत्यूचे प्रमाण सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या घटना आपल्याला निरंतर पहायला मिळतात.त्यामुळे आज जगातील देशांचे व देशातील प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे की पर्यावरणाला वाचविण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून "घर तिथे झाड" ही मोहीम राबविली पाहिजे.जंगल तोडीमुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता सरळ समुद्रात किंवा नद्यांमध्ये जातांना आपण पहातो.यामुळे विहीरीच्या पाण्याची पातळी दीवसें-दीवस कमी होतांना दिसते. याकरीता ७०० फुट बोअरवेल खोदुन मानव पाण्याची तहान भागवत आहे. पाण्यासाठी ७०० फुटांवर मानवाने जाने म्हनजे देवलोकातील (पाताळातील) पाणी आनल्या सारखे आहे.मानवाचा अधिकार फक्त ५० ते १०० फुटांपर्यंतच आहे.परंतु मानवाने आपल्या बुद्धीचा अतीरेक केला त्यामुळेच आज मानवावर निसर्ग कोपत आहे ही सत्य परिस्थिती आहे.यावरून स्पष्ट होते की मानवजाती स्वत:च्या स्वार्थासाठी कोणत्याही स्तरावर जायला मागेपुढे पाहत नाही. कोव्हीड-१९ची महामारी मानवाच्या अतीरेकामुळेच झालेली होती.एप्रिल-मे महीना उष्णतेच्या लाटेचा होता त्यामुळे "संपूर्ण भारतात उष्णतेची लाट आणि पाण्याचा हा!हा!कार!"पहायला मिळाला. तळपत्या सुर्याने संपूर्ण भारतात उष्णतेची लाट पसरली.पशु-पक्षी पाण्यासाठी वणवण भटकतांना दीसतात.हा संपूर्ण प्रकार पर्यावरणाचे संतुलन डगमल्याचा आहे.त्यामुळे निसर्गाला वाचविने काळाची गरज आहे.निसर्ग वाचला तर पृथ्वी वाचेल, पृथ्वी सुरक्षीत रहाली तर मानवजाती, पशु-पक्षी, जिवसृष्टी,जिवजंतु सुरक्षित राहील.परंतु याकरिता सर्वांनीच पर्यावरणाची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. पर्यावरण वाचविण्यासाठी जल, वायु, भुमि यांची जोपासना करणे गरजेचे आहे.संपुर्ण जगात जल व वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात दीसुन येते.पर्यावरण टीकुन रहावे याकरिता प्रत्येक देश पर्यावरणावर करोडो रुपये खर्च करतात. परंतु कोव्हीड-१९ च्या महामारीच्या काळात जगात लॉकडाउन होता यामुळे हवाई वाहातुक, रेल्वे, कारखाने व इतर संपूर्ण वाहातुक बंद होती. यामुळेच करोनाकाळात पर्यावरण अत्यंत आल्हाददायक होते.नद्यांना प्रदुषनापासुन मुक्त करण्यासाठी सरकारने करोडो रुपये खर्च केले.परंतु लॉकडाउनच्या काळात नदी,नाले,तलाव आपोआप प्रदुषण मुक्त झाले व पृथ्वी वरील निसर्ग बहरला आणि पर्यावरणात आपोआप सुधारणा झाली.५ जुन जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मी सरकारला आव्हान करतो की लॉकडाउनच्या काळातील प्रदुषणाची मुक्ती पहाता "दर महिन्याला एक दिवस लॉकडाउन ठेवायला पाहिजे" असे माझे स्पष्ट मत आहे.वाढती लोकसंख्या,वाढते औद्योगीकीकरण पृथ्वीला व पर्यावरणाला घातक आहेच यात दुमत नाही.परंतु यातुन मार्ग आपल्यालाच काढावाच लागेल. याकरीता शहरीकरणाचा व औद्योगीकीकरणाचा विस्तार रोखायला पाहिजे आणि मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून व महीण्यातुन "एक दिवस" लॉकडाउन ठेवण्याचा "संकल्प" भारतासह संपूर्ण जगाने घ्यायला हवा.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे हे विनाशाचे संकेत आहे. यापासुन जगातील संपूर्ण देशांनी शस्त्रसंधी करून दारूगोळयामध्ये कपात करायला पाहिजे.यामुळे पर्यावरण वाचविण्यासाठी मोठी मदत होईल.अन्यथा "विनाशकारी विपरीत बुद्धी" असा प्रकार व्हायला वेळ लागणार नाही. याकरीता पर्यावरण वाचविण्याचा संदेश संपूर्ण जगात जायला पाहिजे.पर्यावरण वाचविण्या करिता "शक्तीचा" वापर न करता "भक्तीचा व युक्तिचा" वापर जास्त केला तरच "निसर्ग" भरभराटीला येईल. पृथ्वीतलावरील ऑक्सीजनची कमी पहाता प्रत्येकाने आपल्या घरी तुळशी, मनीप्लांट, जुही,एलोवेरा इत्यादी वृक्ष अवश्य लावले पाहिजे.त्याचप्रमाणे ग्राउंडच्या ठिकाणी किंवा उद्यानाच्या ठिकाणी वडाचे झाड, पीपळ, नीम, आंबा इत्यादी झाडांची लागवड करून ऑक्सिजनची मात्रा वाढवीली पाहिजे व पर्यावरणाला वाचवीले पाहिजे."झाडे लावा, झाडे जगवा व पर्यावरण वाचवा"

----------------------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------------

पेरणीचा हंगाम उंबरठ्यावर आहे. शेतकऱ्यांनी आता योग्य बियाणांची निवड आणि त्यावर बीजप्रक्रिया करण्याकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे. रोगट बियाणांमुळे शेतकरी संकटात सापडतात आणि उत्पादनावर परिणाम होतो. योग्य बीजप्रक्रिया आणि उगवण क्षमतेची खात्री झाल्यास पेरणीनंतरचा नुकसानीचा धोका मोठ्या प्रमाणावर टळतो. तसेच दर्जेदार उत्पादन मिळण्याची शक्यता वाढते. बियाणांची उगवण क्षमता तपासण्याची प्रक्रिया अत्यंत सुलभ आहे. बियाणांच्या साठ्यातून सुमारे १०० दाणे निवडून त्यांची उगम चाचणी करावी. त्यासाठी मातीचा ट्रे, गोणपाठ किंवा टिशूपेपर वापरता येतो. ५ ते ७ दिवसांत किती दाण्यांतून कोंब फुटले यावरून उगवण क्षमता समजते. किमान ७० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त उगम दिसल्यास ते बियाणे वापरण्यायोग्य ठरते. बियाणांवर योग्य प्रक्रिया न केल्यास उगम दर कमी होतो आणि उत्पादनात मोठी घट होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करून घ्यावी. बीजप्रक्रिया केल्यामुळे बियाण्यापासून प्रसारित होणाऱ्या आणि जमिनीत असणाऱ्या बुरशीजन्य रोगापासून संरक्षण मिळते. जमिनीत असणाऱ्या किडींचा तसेच पेरणी पासून ३०-३५ दिवस रस शोषक किडी आणि खोड माशी यांचा प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होते. कीड व रोग व्यवस्थापनेच्या खर्चात बचत होते. बियाण्याची उगवण क्षमता वाढवते. जैविक खताच्या प्रक्रियेमुळे जिवाणू झाडांना/पिकांना अन्नद्रव्य लवकर उपलब्ध करून देतात. त्यामुळे झांडाची/पिकांची वाढ जोमाने होते. उत्पादनात वाढ होते. बीजप्रक्रिया करण्यासाठी हातमोजे, मास्क, चष्मा या सारख्या व इतर संरक्षण करणाऱ्या बाबीचा वापर करावा. बीजप्रक्रिया तळवटावर किंवा बारदाण्यार किंवा सीड ड्रम/यंत्राद्वारे सावलीत करावी. बियाणे हाताने चोळू नये, कापडाने किवा पिशवी मध्ये एकत्र मिसळून घ्यावे. रासायनिक आणि जैविक बीजप्रक्रिया एकत्र करू नयेत. बीजप्रक्रिया केलेले बियाणे ३-४ तासाच्या आत पेरणी साठी वापरावे. बीजप्रक्रिया बुरशीनाशक-किटकनाशक-जीवाणू अशा क्रमाने करावी.

# शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद एल एल बी परीक्षा उत्तीर्ण

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



**कष्ट व शिकण्याची जिद्द हे गुण असल्यावर शेती, हॉटेल, रसवंतीगृह, मुंबईत कस्टममध्ये नोकरी , पुणे विद्यापीठ वक्ते, एल. एल. बी.अशा परिस्थितीमुळे अपुर्ण राहिलेल्या इच्छा पुर्ण करण्यासाठी वयाची अट नसते हे शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद यांच्या संघर्षमय प्रवासातुन पुन्हा एकदा सिध्द झाले.**

पारनेर तालुक्यातील निघोज येथील शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद सर हे सोमवारी जाहीर झालेल्या एल.एल.बी .परिक्षेच्या निकालात चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. शेतकरी कुटुंबातुन शिक्षण घेतलेले प्रा.ज्ञानेश्वर कवाद सर यांनी १२ वी पर्यंत शिक्षण निघोज येथे पुर्ण केले.महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण झाल्यानंतर शिवविचारांचा मनावर लहानपणापासूनच प्रभाव असाल्याने शिवव्याख्यान देत असताना संजीवनी का◌ॅलेज येथे बीएड पुर्ण केले.त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये परिक्षा देवुन विद्यापीठात बहि:शालचे वक्ते म्हणुन बहुमान मिळविला. या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये शिवविचारांचे प्रबोधन घडवण्याची संधी भेटली.२० वर्षात प्रा.ज्ञानेश्वर कवाद सर यांचे मार्गदर्शन लाभलेले अनेक विद्यार्थी आज उच्च पदावर काम करत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात करण्याची संधी भेटली.ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची सेवा करता यावी म्हणुन विद्याधन क्लासेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानदान देण्याबरोबर नवतरुणांना शिवविचाराचे प्रबोधन करुन अनेक तरुणांना काम करण्याबरोबर शिकण्याची जिद्द मनात ठेवून एल.एल.बी करण्याचे ठरविले व चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होवुन वकिली क्षेत्रात काम करण्याची इच्छा पुर्ण केली.जिद्द , परिश्रम या बळावर त्यांनी कधीही परिस्थितीसमोर हार मानली नाही.सामाजिक क्षेत्रातही त्यांचे कार्य अद्वितीय आहे.अनेक आंदोलने, मोर्चा या माध्यमातून त्यांचे कार्य वाखाणण्यासारखे आहे . शिकण्याची अपुर्ण राहिलेली इच्छा पुर्ण करत असताना हॉटेल, रसवंतीगृह, मुंबई मध्ये कस्टम मधील नोकरी ते पुणे विद्यापीठ वक्ते व एल एल बी पर्यंतचा त्यांचा प्रवास युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे .

# डिजिटल मिडियालाही आता सरकारी जाहिराती मिळणार
## एस.एम.देशमुख यांचेकडून देवेंद्र फडणवीस यांचे आभार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



डिजिटल मिडियाला सरकारी जाहिराती मिळाव्यात ही अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मिडिया परिषदेची मागणी होती.. त्यासाठी परिषदेचा गेली पाच वर्षे पाठपुरावा सुरू होता.. अखेर परिषदेच्या पाठपुराव्याला काल यश मिळाले.. सरकारने सर्व सरकारी विभागांना डिजिटल मिडियाला जाहिराती देण्याबाबत परिपत्रक काढले.. त्यामुळे यापुढे प्रिन्ट, इलेक्ट्रॉनिक माध्यमाप्रमाणेच डिजिटल मिडियाला देखील सरकारी जाहिराती मिळतील.. महाराष्ट्रात २५०० पेक्षा जास्त युट्यूब चॅनल्स आणि पोर्टल्स आहेत.. जवळपास ५००० पत्रकार या माध्यमाशी जोडलेले आहेत.. सरकारी निर्णयाचा या सर्वांना लाभ होईल.. तसेच डिजिटल मिडियाचा अधिक प्रचार आणि प्रसार होण्यास मदत होईल.. तसेच या माध्यमातील पत्रकारांसाठी कायमस्वरूपी उत्पन्नाचे नवे साधन उपलब्ध होणार आहे.. परिषदेची मागणी मान्य केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारचे मनापासून आभार.. डिजिटल मिडियाने आता गंभीरपणे पत्रकारिता करीत प्रिन्ट प्रमाणे जनतेचा विश्वास संपादन केला पाहिजे.. अशी सर्वांना एस.एम. देशमुख यांनी विनंती केली आहे.. सोशल मिडियाला सरकारी जाहिराती सुरू होत असल्याने आता या माध्यमातील पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका देखील मिळाल्या पाहिजेत.. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मिडिया परिषद त्यासाठी पाठपुरावा करीत राहील असे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी सांगितले. मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्यासह विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्याध्यक्ष मिलींद आष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवडे, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपुरकर, सरचिटणीस मन्सुरभाई शेख, डिजिटल मिडीयाचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले.

# राजू देशपांडे यांचे धार्मिक व सामाजिक कार्य मोठे:-डॉ.भास्करराव शिरोळे

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------




पारनेर तालुक्यातील निघोज येथील राजू देशपांडे यांनी पौराहित्य करताना सामाजिक काम म्हणून मुलामुलींचे विवाह जमवीण्याचे जे काम केले आहे त्याची आजच्या काळात गरज असल्याचे प्रतिपादन नित्यसेवा प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ.भास्करराव शिरोळे यांनी व्यक्त केले आहे. देशपांडे यांनी तसेच डॉ.शिरोळे यांनी वाढदिवस निमित्ताने मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयाला देणगी दिली त्याबद्दल देशपांडे यांचा डॉ. शिरोळे तसेच डॉ. शिरोळे यांचा ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, कोषाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सहसचिव विश्वासराव शेटे, विश्वस्त संतोषशेठ रसाळ, शंकरराव लामखडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला . यावेळी पठारवाडीचे मा.उपसरपंच दौलतराव सुपेकर, मा.उपसरपंच शंकरराव पठारे, जयसिंग हरेल आदी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. शिरोळे यावेळी म्हणाले राजू देशपांडे यांनी आजपर्यंत गेली दहा ते पंधरा वर्षांच्या कालावधीत पौराहित्य करताना धार्मिक विधी करताना विवाह जमवीण्याचे काम केले. आजच्या काळात विचार केला तर लग्न जमवणे किती जिकीरीचे झाले आहे. मात्र शेकडो विवाह जमवून ते दांपत्य सुख समाधानाने नांदत आहेत यासाठी सामाजिक योगदान देण्याचे काम देशपांडे काका यांनी केले आहे. आणी आजपर्यंत जे धार्मिक व सामाजिक काम केले त्यांची नोंद कायमस्वरूपी कशी राहील यासाठी त्यांनी कामांचा संग्रह पुस्तकरुपी केला असून आज खऱ्या अर्थाने अशा सामाजिक कामांची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त संतोषशेठ रसाळ यांनी केले शेवटी विश्वस्त शंकरराव लामखडे यांनी आभार मानले.

# शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी कृषीभूषण ऍड. प्रकाश पाटील यांनी घेतली कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची भेट

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------





कृषी आयुक्त सुरज मांढरे. रावसाहेब भागडे महासंचालक कृषी शिक्षण व संशोधन परिषद डॉ हेमंत वसेकर स्मार्ट प्रकल्प संचालक पुणे

शेतीविषयक बाबींसाठी कृषिभूषण ऍड प्रकाश पाटील यांनी कृषीमंत्रीं माणिकराव कोकाटे,कृषी आयुक्त सुरज मांढरे IAS, महाराष्ट्र शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे I A S , प्रकल्प संचालक डॉ हेमंत वसेकर (I A S ) यांना भेटले.राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना अंतर्गत शेतकऱ्यांना नविन संशोधीत प्रमाणित बियाणे (गुणवत्ता पुर्वक) उपलब्ध करून देते.याकरीता केंद्र सरकार व राज्य सरकार अनुदान देते.प्रमाणित बियाणे तयार करण्यासाठी खर्च जास्त येतो.त्यामुळे बियाणे महाग मिळते, म्हणुन हे चांगले बियाणे बाजारात अत्यंत कमी विकले जाते.याचे प्रमाण वाढावे, म्हणुन सरकार बियाणे तयार करण्यासाठी व विक्री साठी अनुदान देते.हे अनुदान महाबीज, नॅशनल सीड कार्पोरेशन , शेतकरी उत्पादक कंपन्या मार्फत दिले जाते.मात्र ह्या वर्षी पासुन शासनाने शेतकरी उत्पादक कंपनींना वगळले.यामुळे दर्जेदार प्रमाणित बियाणेचे उत्पादन कमी होईल.व निम्न दर्जाचे ट्रुथफुल बियाणे जास्त विकले जाईल.यामुळे शेतकऱ्यांना नुकसान होईल.याकरीति कृषीमंत्रीं यांना निवेदन देऊन चर्चा केली.यानुसार त्यांनी कृषी आयुक्त यांना फोन करून निर्देश दिले.दिलेल्या निर्देशानुसार प्रकाश पाटील यांनी कृषी आयुक्त यांची भेट घेतली. देशात किमान आधारभूत किमतीत खरेदी केली जाते.मात्र महाराष्ट्रात एकुण उत्पादनाच्या फक्त ७%खरेदी केली जाते.यातही भ्रष्टाचार होतो.याकरीता भ्रष्टाचार विरहीत भावांतर योजना (प्रत्यक्ष खरेदी न करता) देशपातळीवर राबवुन शेतकऱ्यांना हमी भावापेक्षा जी किंमत कमी राहते,तेवढे पैसे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डी बी टीने ध्यावेत.ह्या योजनेमुळे शेतकऱ्यांसोबत केंद्र सरकारचा सुध्दा निधी वाचुन फायदा होईल. याकरीता केंद्रीय कृषिमंत्री यांचे कडे शिफारस करुन देशभर ही योजना राबविण्यासाठी विनंती केली.यानुसार मंत्र्यांनी सांगितले की, केंद्रीय कृषिमंत्री हे महाराष्ट्रात येत आहेत, त्यावेळी त्यांना विनंती केली जाईल,असे सांगितले.

यासोबतच राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत, याकरीता ज्या बँका शेतकऱ्यांना लक्षांकानुसार कर्ज देतील, त्यांच्याच बँकेत शासनाचा विविध योजनांचा निधी ठेवावा, अशी मागणी केली.कारण हा निधी विना व्याजाने बँकांना वापरायला मिळतो.यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याचे प्रमाण वाढेल.यानुसार कृषीमंत्र्यांनी सांगितले की, यानुसार मुख्यमंत्री यांना पत्र देऊन कार्यवाही करायला लावु. तसेच शेतमालावर प्रक्रिया करण्यासाठी गावठाणाच्या हद्दीबाहेर बांधकाम केले जाते.ग्रामपंचायती त्यांना काहीच सोय उपलब्ध करून देत नाही.तरीही कराची आकारणी केली जाते,ती रद्द करावी अशी मागणी केली.यानुसार कर आकारणी रद्द करण्यासाठी प्रस्ताव ग्राम विकास खात्याकडे करण्यासाठी प्रस्ताव पाठवु,असे आश्वासन कृषीमंत्र्यांनी दिले. स्मार्ट प्रकल्पात बांधकाम करण्यासाठी किचकट प्रक्रिया आहे.यात का◌ॅन्ट्रक्टरला काम देऊन भ्रष्टाचार केला जातो.व काम योग्य दर्जाचे होत नाही.यामुळे हे काम ज्या शेतकरी उत्पादक कंपन्या स्वतः काम करु इच्छितील, त्यांना करु ध्यावे,अशी मागणी केली.यानुसार मंत्री महोदयांनी संबंधित प्रकल्प संचालक डॉ हेमंत वसेकर यांना फोन

# पिंपळनेर येथे ०६ जुन रोजी महाआरोग्य शिबिराचे आयोजन
## शिवसेना पक्ष वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि साक्री विधानसभा आमदार यांचा सहभाग

संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------------




साक्री तालुक्यातील पिंपळनेर येथे शुक्रवार दि. ०६ जुन २०२५ रोजी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन, आमदार साक्री आणी शिवसेना पक्ष यांच्या सयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिराचे आयोजन एन.एस.पी. विद्यालय (विद्यानंद हायस्कुल) चिकसे रोड पिंपळनेर ता. साक्री येथे केले असल्याची माहिती आमदार सौ. मंजुळाताई गावित व शिवसेना जिल्हा प्रमुख यांनी प्रसिध्दिस दिली. या शिबिरात शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाचा सहभाग असुन डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन यांचे सहका-यांच्या समवेत मुंबई व धुळे येथील तज्ञ डॉक्टरांकडुन तपासणी केली जाईल. या आरोग्य शिबिरात बालरोग तपासणी, नेत्ररोग तपासणी, आरोग तपासणी, अस्थिरोग तपासणी, नाक-कान-घसा तपासणी, हृदयरोग तपासणी, मेंदु विकार, दंतरोग तपासणी, त्वचारोग तपासणी, किडनी तपासणी, इ. तपासण्या करण्यात येणार आहेत. या शिबिराच्या निमित्ताने शालेय शिक्षण मंत्री मा.ना.श्री. दादाजी भुसे साहेब, आरोग्य मंत्री मा.ना.श्री. प्रकाश आबिटकर, पालकमंत्री मा.ना.श्री. जयकुमारभाऊ रावल, पाणीपुरवठा मंत्री मा.ना.श्री. गुलाबरावजी पाटील, उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख मा.ना.श्री. भाऊसाहेब चौधरी, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख श्री. मंगेश चिवटे आणी प्रथमेश पाटील उपस्थित राहणार असल्याची माहिती आमदार सौ. मंजुळाताई गावित यांनी दिली. या शिबिरास विशेष सहकार्य म. तहसिलदार साक्री, म. गटविकास अधिकारी, प.स. साक्री, यांचे समवेत म. अधिष्ठाता कै. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धुळे म. जिल्हा शल्य चिकित्सक धुळे, म. जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.धुळे, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी व त्यांचे सहकारी, धुळे जिल्हा सर्व अधिकारी कर्मचारी, धुळे जिल्हा सर्व डॉक्टर व नर्स, ब्रदर्स, हॉस्पिटल अधिकारी व कर्मचारी, लाभणार आहे. शिबिराचे ठिकाणी आयुष्यमान कार्ड काढण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. शिबिराचे ठिकाणी रक्त संकलन करणेसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती डॉ. तुळशिराम गावित यांनी प्रसिध्दिस दिली आहे. शिबिर यशस्वी करणेसाठी शिवसेना पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते घेत आहेत. पिंपळनेर पंचक्रोशीतील व साक्री तालुक्यातील तमाम जनतेने या महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सौ. मंजुळाताई गावित आणी शिवसेना जिल्हा प्रमुख डॉ. श्री. तुळशिराम गावित यांनी केले आहे.

# धुळे जिल्ह्यात काँग्रेसला खिंडार...
## मा.आमदार डी.एस. अहिरे व शामकांत सनेर यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेश होणार

श्री. संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------





राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार व प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत तसेच धुळे जिल्हा पक्ष प्रभारी आ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे धुळे जिल्हाध्यक्ष श्री सुरेश सोनवणे यांच्या प्रयत्नातून काँग्रेस पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर, भारतीय जनता पक्षाचे माजी शहर जिल्हाध्यक्ष सुनील नेरकर, साक्री तालुक्याचे माजी आमदार डी. एस. अहिरे, शिंदखेडा तालुक्याचे माजी आमदार रामकृष्ण पाटील उद्या ०५/०६/२०२५ रोजी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेणार आहेत. अशी माहिती राष्ट्रवादी चे धुळे जिल्हाध्यक्ष श्री सुरेश सोनवणे यांच्या माध्यमातून देण्यात आली.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७